Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 (II)

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

# Index


1. मानवाधिकार आणि मागासवर्गिय वर्ग — 13
   **प्रा. कांबळे दिलीप बबनराव**
2. भारतातील मानवी अधिकार आणि सामाजिक लोकशाहीची यशस्वीता — 15
   **प्रा. सोनवळकर रमेश शंकरराव**
3. मानवी हक्क आणि पोलिस प्रशासन — 20
   **डॉ. संभाजी कोंडबाजी फोले**
4. मानवी हक्क आणि स्त्री — 23
   **गडलवाड सुप्रिया गणपतराव**
5. आदिवासी जमाती व मानवी हक्क — 25
   **प्रा. डॉ. संजय सुरेवाड**
6. मानवी हक्क आणि सिमांत शेतकरी — 27
   **प्रा. गोविद रामराव काळे**
7. मानवाधिकाराचे प्रकार — 29
   **डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे**
8. मानवी हक्क : संकल्पना आणि आवश्यकता — 31
   **प्रा. पवार मनोरमा श्रीधर**
9. भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क — 33
   **ज्योती श्रीपती जोगदंड (वैद्य) , डॉ. वनमाला गुंडरे**
10. **शारिरिक शिक्षण व** मानवी हक्क — 37
    **प्रा.भारत विठ्ठलराव पल्लेवाड**
11. भारतीय संविधान और मानव अधिकार — 39
    **प्रा.डॉ.भारती नकुलराव कांबळे**
12. मानव अधिकार आणि दहशतवाद — 42
    **महेशकुमार चौरे**
13. मानवी हक्क आणि महिला — 44
    **प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे , डॉ. महादेव गव्हाणे**
14. भारतीय अर्थव्यवस्था : रोजगार हक्काची घटनात्मक स्थिती आणि वास्तव — 47
    **डॉ. डी. बी. तांदुळजेकर**
15. मानवी हक्कांच्या संरक्षणात प्रसारमाध्यमे व स्वयंसेवी संस्थांची भूमिका — 50
    **प्रा. डॉ. अप्पाराव चंद्रराव गायकवाड , प्रा.डॉ.आदमाने भाऊसाहेब बंकट**
16. मानवी हक्क आणि महिला — 56
    **डॉ.महादेवी वैजनाथ फड, कावळे एस.टी.**
17. भारतीय अर्थव्यवस्था व मानवाधिकार — 58
    **प्रा. घुटे बालाजी तुळशीराम**

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) - 0.676 Special Issue – 130 (II) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# मानवी हक्क : संकल्पना आणि आवश्यकता

**प्रा. पवार मनोरमा श्रीधर**
संशोधक विद्यार्थी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

---

**प्रस्तावना :**

आधुनिक युगात राष्ट्रीयव आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवी हक्क ही संकल्पना महत्त्वपूर्ण ठरत आहे. मानवी अधिकार ही संकल्पना मानवाच्या जीवनाशी व त्याच्या अधिकाराशी संबधीत आहे. त्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्याची जोपासना केली जाते. मानवी अधिकार हा जन्म सिध्द हक्क असल्यामुळे तो जन्मताच प्रत्येकाला मिळत असतो. समाजात जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्याचे स्वातंत्र्य दिले जाते ही संकल्पना संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने डिसेंबर 1948 रोजी पॅरीस येथे स्विकारलेले वैश्विक घोषणापत्र आहे.

**मानवी हक्क :**

व्यक्ती हा समाजशील प्राणी आहे. त्यामुळे त्याचे काही हक्क असतात ज्या हक्कांच्या व्यक्ती दावेदार ठरतो. त्यास आपण मानवी हक्क म्हणतो. मानवाला समाजात प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्यासाठी काही हक्क उपलब्ध असतात. मानवी हक्कांचे स्वरूप हे चंदिरत नसून ते वैष्विक म्हणजे व्यापक आहे. व्यक्ती व्यक्तीमध्ये वंश, जात, धर्म, संसकृती, भाषा आणि राष्ट्रीयता यांच्यामध्ये कोणताच भेदभाव न करता, व्यक्तीला आपल्या जीवीत, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी काही हक्क उपभोगता आले पाहिजेत सर्व मानव हे समान आहेत. त्या प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठापूर्वक व सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी पूर्ण कराव्या लागतात. या दोन तत्वावर मानवी हक्काची संकल्पना उभी आहे. मानवामध्ये वैचारिक शक्ती आढळते. चांगले वाईट याची जाण प्रत्येक व्यक्तीला असते. प्रत्येक व्यक्ती त्याच्या क्षमतेनुसार निर्णय घेत असतो. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजा आहेत. स्वतःच्या अस्तित्वाची व प्रतिष्ठापूर्वक जीवनाची हमी देण्यासाठी स्वावलंबी व स्वयंरोवी असण्याची गरज स्वभावतः सामाजिक प्राणी असल्याने निर्माण होणारी समुहाची गरज शेवटी आत्मविश्वास, सर्वांगिण विकास व आपले अंतिम ध्येय साध्य करण्याची मानसिक गरज या सर्वांच्याच गरजा असतात. मानवी हक्क या सर्वात्रिक, मुलभूत मानवी गरजांची परिपूर्ती करण्यासाठी अत्यावश्यक ठरतात अशा रितीने हक्क मानवाच्या सार्वत्रिक मुलभुत गरजांतून उगम पावतात आणि त्यांचे वैश्विक मानवी हक्कात रूपांतरण होते.

**मानवधिकार : अर्थ व संकल्पना**

मानवधिकारांचा अर्थ समजण्यासाठी आधी हक्क म्हणजे काय हे लक्षात येणे आवश्यक आहे. हक्क म्हणजे आपल्या विकासासाठी आपण केलेल्या मागण्या होय. या मागण्याना जेव्हा समाजमान्यता व राज्यमान्यता मिळते तेव्हा त्याचे हक्कांत रूपांतर होते. प्रा. हेराल्ड लास्की यांच्या मते, हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती की ज्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस स्वतःची संपूर्ण प्रगती साध्य करता येत नाही. हे हक्क नैतिक, कायदेशीर, राजकीय, अर्थिक स्वरूपाचे असतात. या हक्कांपैकी बहुतेक सर्व हक्क व्यक्तींना जन्माने प्राप्त होतात. व्यक्ती मानव म्हणून जन्माला आल्याने त्याला आपोआप प्राप्त होणाऱ्या हक्कांना मानवधिकार असे म्हणतात. हे हक्क व्यक्तिला समाजाने किंवा राजसंस्थेने बहाल कलेले नसतात, मात्र मान्य केलेले असतात. केवळ जन्मामुळे प्राप्त होतात म्हणून ते हिरावून घेण्याचा अधिकारही कोणला नसतो. मानवी कुटुंबाचे सदस्य या नात्याने सर्व व्यक्तिना मानवाधिकार प्राप्त होतात. देशाच्या घटनेने प्रदान केलेल्या मानवधिकारांना मुलभुत हक्क असे म्हणतात.

**मानवी अधिकारांच्या व्याख्याः**

1. रॅन्डमहाउस विश्वकोष :- मानवधिकार म्हणजे व्यक्तिला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तिला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तिला आत्मसन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक असतात.
2. मॅकफरलेन :- मानव अधिकार हे असे नैतिक अधिकार आहेत जे प्रत्येक स्त्री पुरूषाला माणूस या नात्याने प्राप्त झाले आहेत.
3. मॉरिन क्रॅटसन :- मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून त्यांचे उल्लघंन राज्याला करता येणार नाही.

**उद्देश :**

सदर शोध प्रबंधात खालील उदेश समोर ठेवण्यात आली आहेत.

1. मानवी हक्काची संकल्पना पाहणे.
2. मानवी हक्काचा अर्थ पाहणे.
3. मानवी हक्कांची आवश्यकता पाहणे.
4. मानवी हक्काच्या संबधित उपायांचा शोध घेणे.

**अभ्यास पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आलेलाप आहे. दुय्यम माहितीमध्ये मासिके, ग्रंथ, वर्तमान प्रत्रातील लेख इत्यादीच आधार घेण्यात आला आहे.

**मानवी हक्काची आवश्यकता:-**

भारतात मानवी हक्काची सुरक्षिततात क अमलबजावणीसाठी भारतीय संसदेने अनेक कायदे केले आहेत. तरी प्रत्यक्षात मानवी हक्क विष समाजात फारशी जाणीव व जागृती निर्माण होवू शकली नाही. विशेषत दुर्बलांच्या व स्त्रीयांच्या मानवी हक्काची पायमल्ली होताना दिसून येते. भारत समाजात हुंडांबळी, मारहाण छेडछाड, अमानुश वागणुक असे प्रश्न दिवसेंदिवस वाढत आहेततत. समान काम समान वेतन हे तत्व दिसून येत ना व्यक्ती आणि समाजकल्याणासाठी मानवी हक्क आवश्यक असतात.

मानवाला पुढील बावतीत मानवी हक्काची

1. दुर्वल घटकांचे संरक्षण करणे.
2. वेयक्तिक स्वातंत्र्याचा उपभोग घेणे.

3. अभिव्यक्ती संरक्षण मिळवणे.
4. न्यायालयीन संरक्षण मिळवणे
5. धार्मिक स्वांतत्र्याचा उपभोग घेणे
6. शोषणमुक्त जीवन जगणे
7. मानवी मुल्याची जोपासना करणे.
8. प्राथमिक व मुलभुत मोफत शिक्षण मिळवणे.
9. घटनात्मक उपाय योजनांच्या हक्कांचे रक्षण करणे.
10. मानवी हक्कांचे उल्लघंन करणाऱ्या राष्ट्रावर दबाव आनणे

**मानवी हक्काच्या सुरक्षिततेचे उपायः-**

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना मुलभूत व मानवी हक्क प्रदान केलेले आहेत. प्रत्येकाला जीवीत व सुरक्षितता, गुलामगिरी व दास्य प्रथेतुन मुक्ततेचा घटनात्मक उपाययोजनेचा संपत्तीचा, संघटना स्थापण्याचा हक्क, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क, समान वेतनाचा हक्क इत्यादी हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. या हक्कोंच्या सुरक्षिततेसंबधी उपाय योजना करणे आवश्यक असते. तेव्हाच प्रत्येकाला आपल्या मानवी हक्काचा उपभोग घेता येतो. परंतु बऱ्याचदा विविध घटकाकडुन मानवी हक्कांचे उल्लघन होत असल्याचे दिसून येते. यासाठी भारतात विविध कायदेशी उपाय योजना केलेल्या आहेत. त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. मानवी हक्कांच्या सुरक्षिततेसंबधी पुढील उपाय योजना आहेत.

1. हुंडा प्रतिबंधात्मक अधिनियम 1961
2. नागरी हक्कांच्या सुरक्षिततेचा कायदा 1935
3. राष्ट्रीय महिला आयोग कायदा 1990
4. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग
5. मानवी हक्क न्यायालय
6. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग कायद 1993
7. दुर्बल, अंपग, अपात्र लोकांना समान संधी, हक्काच रक्षण, पूर्ण सहभाग प्राप्तीचा कायदा 1995

**सांराश**

मानवी हक्क या संकल्पनेत समान हक्क व स्वातंत्र्य याला प्राधान्य दिलेले आहे. प्रत्येकाला आपले नेसर्गिक हक्क उपभोगता आले पाहिजेत. मानवतेच्या भूमिकेतून व्यक्तीला मानवी हक्क मिळाले पाहिजेत त त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. प्रत्येकला जन्मापासून जगण्याचा हक्क असतो. परंतु गर्भजल परिक्षणादारे स्त्रीलिंगी गर्भाची हत्या केली जात आहे. त्यामुळे मानवीउ हक्कातील समानतेच्या तत्वाला बाधा येत आहे. मानवी हक्काचाउ भंग झाल्यास व्यक्तिला न्यायालयात दाद मागता येते. अशा प्रकारे मानवी हक्क समता, न्याय, बंधुतर व प्रतिष्ठा या तत्वावर आधारलेले असून त्यांच्याकडून समाजहित उव व्यक्तिहित साधले जाते.

**संदर्भ :-**

1. नंदकुमार भारवे, मानवी हक्क व समाज, निराली प्रकाशन पुणे
2. योजना मासिक एप्रिल 2011.
3. घांगरेकर सी.सी.श (2011) भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकारण, मंगेशश प्रकाशन, नागपूर
4. रंजन कोळंवे (2012) मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार, भागरिथ प्रकाशन, पुणेक

Shri Swami Vivekanand Bahu-Uddeshiya Vikas Mandal's

**Shivjagruti Senior College, Nalegaon**

Tq. Chakur, Dist. Latur - 413524 (M.S.)

In Collaboration with

Indian Council of Social Science Research, Mumbai &

Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

**One Day Interdisciplinary National Seminar on**

**Research Methodology in Social Sciences and New Trends**

22nd August 2018

---

**PROCEEDINGS BOOK OF NATIONAL SEMINAR**

# संशोधन पद्धती

## Research Methodology

**डॉ.संजय वाघमारे**
**(प्राचार्य)**

**डॉ.ओमशिवा लिगाडे**
**(समन्वयक)**

**संपादक**

**प्रा.अमोल पगारे**
**डॉ.लहू वाघमारे**
**डॉ.विनोद सोनवणे**
**डॉ.अरविंद कदम**
**डॉ.चंद्रशेखर ढोले**
**प्रा.रामराव चव्हाण**

---

**अरुणा प्रकाशन, लातूर**

15. Application Method of Crop Combination, According to Doi's Method: A Study in Agriculture Geography ............ ९२
**Dr. N. S. Magar, Dr. S. R. Dharashive**

16. An Overview of Quantitative and Qualitative Data Collection Methods ............ १००
**Dr. Abbanapuri Yakaiah**

१७. अनुसंधान प्रणाली एवं साक्षात्कार ............ १०८
**प्रा. डॉ. संगीता श. उप्पे**

१८. सामाजिक संशोधनात प्रश्नावलीची विश्वसनीयता आणि महत्त्व ............ ११३
**डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे**

१९. सामाजिक संशोधनातील अहवाललेखनाचे तंत्र ............ ११६
**प्रा. डॉ. बावा ए. एस.**

२०. संशोधन कार्य व अहवाललेखन ............ ११९
**प्रोफेसर. डॉ. के.के.पाटील, पवार मनोरमा श्रीधर**

२१. संशोधनात संशोधन प्रकाराचे महत्त्व ............ १२२
**प्रा. गजानन आनंता देवकर**

२२. इतिहास संशोधनात शिलालेखांचे महत्त्व ............ १२५
**डॉ. गणेश काशिनाथ होनराव**

२३. साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दती ............ १२९
**डॉ. अरविंद वसंतराव कदम**

२४. सामाजिक शास्त्रातील संशोधन अहवाल ............ १३४
**प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे**

२५. सामाजिक संशोधन प्रक्रियेतील विषयाची निवड ............ १३८
**प्रा.डॉ.कांबळे व्हि. एम.**

26. A comparative study on dynamic balances between football and basketball players ............ १४१
**KHURSHID AHMAD HURRAH**

२७. सामाजिक संशोधनाचा अर्थ व प्रकार ............ १४४
**प्रा.कुडमते विलास देवराव**

२८. सामाजिक संशोधनात गृहीतकृत्याचे महत्व आणि उपयोगिता ............ १४७
**प्रा. डॉ. मुळे ए. बी.**

२९. संशोधनातील सर्वेक्षणाचे महत्त्व ............ १५०
**श्रीमती नाडे एच.बी.**

३०. संशोधनात प्रश्नावलीचे महत्त्व ............ १५२
**प्रा.हंचाटे एस.यू.**

३१. संशोधन अध्ययनातील नमुना निवडीचे तंत्र ............ १५५
**डॉ. भालेराव जे.के.**

# संशोधन कार्य व अहवाललेखन

**प्रोफेसर. डॉ. के.के.पाटील**
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
कै.सौ. कमलताई जामकर महिला
महाविद्यालय, परभणी

**पवार मनोरमा श्रीधर**
संशोधक विद्यार्थीनी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Email - neetapande८६@gmail.com

**प्रस्तावना :-**

भगीरथ प्रयत्न करून प्रदीर्घ परिश्रम यातून संशोधकाने कण जमा केलेले असतात. अक्षरश: रक्ताचे पाणी करून त्याने संशोधनाची इमारत उभी केलेली असते; पण इमारतीचा कळस चढविण्याचे काम अहवाललेखनाने होत असते.

**संशोधन अहवाल** तयार करणे ही संशोधनकार्याची शेवटची अवस्था असते. संशोधकाने संशोधनाचे जे कार्य हाती घेतलेले असते आणि अथक प्रयत्नांनी ते पूर्ण केलेले असते. त्या संशोधनप्रक्रियेची संशोधन अहवाल ही शेवटची अवस्था असते. संशोधनादरम्यान संशोधकाने ज्या-ज्या कृती केल्या, पद्धती वापरल्या, वास्तविक माहिती मिळवून तिचे शास्त्रीय विश्लेषण करून अभ्यासविषयाबाबतचे निष्कर्ष काढले, हे संशोधकाला समाधान देत असतात; पण संशोधकाने काढलेले निष्कर्ष व्यवस्थितरित्या व सूत्रबद्ध पद्धतीने जगापुढे ठेवले पाहिजे. पीएच.डी.साठी प्रबंध लिहून सादर करावा लागतो, त्याची योग्य मांडणी करावी लागते. ज्या संशोधनसंस्थेत किंवा विद्यापीठात संशोधनकार्य करीत असेल, तर त्या संस्थेला निश्चित कालावधीत आपला संशोधन अहवाल सादर करावा लागतो. संशोधकाने संशोधन कितीही उत्कृष्ट केले असेल; परंतु त्याचा अहवाल सादर केला नसेल तर त्या संशोधनाला महत्त्व नसते. संशोधनकार्याचा अहवाल लिहिल्याशिवाय संशोधनकार्य पूर्ण होत नाही. म्हणून संशोधन अहवाल संशोधनकार्याची शेवटची अवस्था आहे, असे म्हटले जाते. संशोधन अहवालात संशोधनाचा उद्देश, अध्ययनक्षेत्र, संशोधनपद्धती, तंत्रे, संकलित तथ्यांचे विश्लेषण, व्याख्या, निष्कर्ष आणि काही महत्त्वाच्या सूचना या सर्व बाबींचा समावेश होत असतो. संशोधनाचा अहवाल तयार केल्यामुळे संशोधकाने कोणत्या विषयाबाबत कोणते, कशा प्रकारे संशोधन केले, कोणते निष्कर्ष मांडले यासंबंधीची माहिती प्राप्त होते. त्या विषयाशी संबंधित दुसरा एखादा संशोधक संशोधन करून त्या निष्कर्षांची पुनर्परीक्षा करू शकतो. संशोधकाने आपल्या संशोधनातून मांडलेले महत्त्वपूर्ण निष्कर्ष, शिफारशी, सूचना लक्षात घेऊन विविध सामाजिक योजना आखणे शक्य होते. संशोधन हे एक व्यक्ती किंवा संस्था करीत असली, तरी ते संपूर्ण लोकांपुढे येणे आवश्यक असते. अन्यथा, ते संशोधन संशोधकापुरतेच मर्यादित राहते. त्यामुळे केलेल्या संशोधनाचा अहवाल लिखित स्वरूपात प्रस्तुत करणे अनिवार्य असते. जेणेकरून, त्याचा फायदा संपूर्ण समाजाला मिळाला पाहिजे.

**व्याख्या :**

१) प्रा. हंसराज म्हणतात की, 'समाजाला केलेले परिणामकारक व हेतुपूर्वक निवेदन म्हणजेच खरेखुरे अहवाल लेखन होय.'

२) गुड आणि हॅट यांच्या मते, 'अहवाल तयार करणे हे संशोधनाचे अंतिम चरण होय आणि त्याचा उद्देश इच्छूक वाचकांना अध्ययनातून काढण्यात आलेल्या परिणामांना समजू शकेल अशा व्यवस्थित व विस्तारपूर्वक स्वरूपात मांडणे होय की ज्याद्वारे वाचक तथ्यांना समजू शकेल व स्वत:पुरता तरी संशोधनाच्या निष्कर्षांची प्रामाणिकता पडताळून पाहण्यायोग्य बनेल.'

**अहवाललेखनाचे स्वरूप :** अहवाललेखन हे एक शास्त्र व कलाही आहे. संशोधन अहवाल लिहिणे हे एक कौशल्याचेच काम आहे. त्याचे लेखन करताना संशोधकाला अतिशय सावधगिरी बाळगावी लागते. त्यासाठी संशोधकाला संशोधनविषयाची व्याप्ती लक्षात घेऊन संशोधन अहवाल हा सुसंगत व काटेकोरपणे लिहावा लागतो. संशोधन अहवाल म्हणजे केवळ तथ्यांचे किंवा संदर्भांचे संकलन नाही, तर गृहीतकृत्ये, तथ्ये, संदर्भ, सिद्धांत या सर्व बाबी परस्परावलंबी आणि परस्परपूरक असतात. त्यामुळे त्यांच्यातील संबंध स्पष्ट करून निष्कर्ष काढण्यासाठी उपयोग होईल, अशा पद्धतीने त्यांची मांडणी केली पाहिजे. संशोधकाचे भाषेवर प्रभुत्त्व असणे आवश्यक आहे, भाषा व्याकरणदृष्ट्या सरळ, साधी, सोपी व शुद्ध असली पाहिजे. वाक्यांची लांबी माफक असावी, अहवाललेखनात अचूकता आणि स्पष्टता असली पाहिजे. आपल्याला कोणती माहिती, कशा प्रकारे वाचकांना कळवायची आहे, याबाबत संशोधकाने योग्य निर्णय घ्यावा. याशिवाय, अहवालात उपयोगात आणलेल्या पारिभाषिक संज्ञांचे पुरेसे स्पष्टीकरण दिले पाहिजे. संपूर्ण संशोधनविषयाची मांडणी तर्कशुद्ध आणि सुसंगत असावी. अनुमापे आणि निष्कर्ष यांना आवश्यक त्या ठिकाणी सबळ पुरावे द्यावेत. वर्गीकरण व सारणीयन करून त्यांचे स्पष्टपणे विश्लेषण करावे. अहवाललेखनात टीपा, तळटिपा, उपशीर्षके, आराखडे, आकृती इत्यादींचा उपयोग केला पाहिजे. संख्याशास्त्रीय पद्धतीचा उपयोग अत्यंत काळजीपूर्वक आणि काटेकोरपणे करावा.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊनच अहवाललेखन केल्यास लिखाणाला एक शैली प्राप्त होते आणि संशोधनकार्याचा अहवाल आदर्श ठरतो.

**संशोधन अहवालाचा उद्देश :**संशोधनकार्य संपल्यानंतर त्याचा विस्तृत अहवाल तयार करणे आवश्यक असते. संशोधनकार्याची सुरुवात करताना जे हेतू निर्धारित केलेले असतात, त्याचे प्रतिबिंब संशोधनात सापडणे आवश्यक असते. कारण अहवाललेखन हाच संशोधनाचा शेवट असतो. अहवाल सादर करण्यामागे संशोधकाचे अनेक उद्देश पुढीलप्रमाणे असतात.

१) **नवीन ज्ञानाचे प्रस्तुतीकरण -** संशोधकाने जे संशोधन केलेले आहे, ते अहवालाच्या स्वरूपात समाजापुढे आणणे आवश्यक आहे. जेणेकरून, त्याचा उपयोग समाजाला-शासनाला धोरणे ठरवताना करता येईल.

२) **संशोधनकार्याचे महत्त्व सामान्यापर्यंत पोहोचविणे -** संशोधनकार्याचे महत्त्व सामान्य

जनतेला समजणे हे संशोधन अहवालाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे.

३) **वस्तुस्थिती समजते -** संशोधन अहवालात संशोधनविषयासंबंधी परिपूर्ण आणि पद्धतशीर माहिती असते. तसेच अहवालात संस्थेच्या सर्व पैलूंवर प्रकाश टाकला जातो. त्यामुळे त्या विषयाची सर्वांगीण माहिती कळू येते.

४) **सामाजिक धोरणे ठरविण्यासाठी उपयुक्त -** संशोधन अहवालात संशोधकाने सामाजिक समस्येवर उपाययोजना सुचविलेली असते. त्यामुळे राजकीय नेते, सामाजिक नेते, शासनसंस्था यांना धोरणे ठरविण्यासाठी त्यात प्रसिद्ध झालेल्या माहितीचा आणि निष्कर्षांचा उपयोग होतो.

५) **भविष्यकालीन संशोधनासाठी उपयुक्त -** संशोधन अहवालामुळे त्याच संशोधनसमस्येसंबंधी भविष्यकाळात संशोधन करण्याची संधी इतर संशोधकांना उपलब्ध होते.

६) **इतर संशोधकांना व संबंधितांना उपयुक्त -** संशोधन आपल्या अध्ययनविषयासंबंधीचे परिणाम, निष्कर्ष आणि सिद्धांत आपल्या अहवालात लिहीत असतो. त्यामुळे त्या विषयाशी संबंधित असणाऱ्या संशोधकाला त्याचा बराच उपयोग होतो.

७) ज्ञानवृद्धी करण्यासाठी संशोधन अहवाल उपयुक्त ठरतो.

**सारांश :**संशोधन अहवाल हे संशोधकाने केलेल्या संशोधनकार्याचे मुद्देसूद व थोडक्यात विवरण असते. संशोधन अहवालामुळे अनेक सामाजिक समस्या, सामाजिक विषय इत्यादींचे ज्ञ ाान प्राप्त होते. शासनाला, सामाजिक कार्यकर्त्यांना, धोरणे ठरविण्यासाठी अहवालाची मदत होते. त्याचप्रमाणे सामाजिक कल्याण, सामाजिक विकास आणि प्रगती यासाठी संशोधन अहवालाचा उपयोग करता येतो. संशोधन अहवाल सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीनेदेखील उपयुक्त असतो. सामाजिक संशोधन हे समाजाशी निगडित असते. अहवालामध्ये सामाजिक विषयांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या सूचना, उपाय दिलेले असतात. त्या सूचना किंवा उपायांचा उपयोग शासनाला धोरणे ठरविण्यासाठी होतो. त्याचप्रमाणे सर्वसामान्य लोकांनादेखील अहवालाचा उपयोग होतो. याशिवाय, संशोधनकर्त्याने केलेले संशोधन हे केवळ संशोधकापुरते मर्यादित राहत नाही, तर त्या संशोधनाचा फायदा नवीन संशोधक, जिज्ञासू अभ्यासक इत्यादींना नवीन संशोधनकार्य हाती घेण्यास प्रोत्साहन मिळते.

**संदर्भ :**

१) 'सामाजिक संशोधन पद्धती', डॉ. भांडारकर पु. ल, महाराष्ट्र विद्यापीठ, नागपूर.

२) 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', डॉ. आगलावे प्रदिप, विद्या प्रकाशन, नागपूर.

३) 'सामाजिक संशोधन पद्धती', डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक आलोणी, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४) 'संशोधन पद्धती', डॉ. वा. भा. पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

५) Research Method in Social Science, Sharma. R. D, National Book, New Delhi.

❋❋❋

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

April 2018, Issue-49, Vol-01

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) Preference for Big Data Predictive Analytics in Human Resource ... || 56
**Pooja Sharma, Ahmedabad**

15) A study on The Women Empowerment through Women Entrepreneurship ... || 63
**Dr. Job Dondapati, Surat**

16) MGNREGA IN KARNATAKA: A STUDY ON THE SOCIO ECONOMIC CONDITIONS ... || 72
**Dr. Y. Gangadhara Reddy, Bangalore, Nagendrappa K.T., Shimoga**

17) A Study of Human Development Index and Comparison of New and old ... || 79
**Prof. Dr. K.K.Patil, Manorama Shridhar Pawar, Nandad.**

18) Parameters Affecting Buying Behaviour of Rural Consumers ... || 83
**Dr. Hitesh Kumar Pant, Dr. Pratibha Pant, Mrs. Anita Tiwari, Nainital**

19) महानुभावांचे चरित्रग्रंथ व लोकाचरित्रांची अपूर्वता || 93
**प्रा. डॉ. भूषण आर. बंड, नागपूर**

20) पेशवेकालीन अर्थव्यवस्थेतील नाणे आणि त्यांचे व्यावहारिक व ऐतिहासिक महत्त्व || 95
**डॉ.प्रा. उमेश पाडुरंगजी तुळसकर, समुद्रपूर**

21) तिरोडा विधानसभा मतदारसंघातील आमदारांच्या स्थानिक विकास कार्याचे ... || 100
**प्रा. हरिशचंद्र पारधी, डॉ. विलास ना. राणे, जि. भंडारा**

22) महाराष्ट्रातील प्रमुख ऐतिहासिक — म्हसोबा यात्रा || 103
**डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी, जि. ठाणे**

23) सामाजिक पुनर्रचनेच्या ध्यासाची कविता || 105
**डॉ.श्रीराम गोविंद गव्हाणे, जि.नांदेड**

24) आदिवासी लोकगीतातून स्त्रीयांचे चित्रण || 107
**प्रा. केंद्रे सीता लक्ष्मणराव, जि.बीड**

25) नंदुरबार जिल्ह्यातील शेततळी योजनेचे वित्तिय व्यवस्थापन- एक सुक्ष्म अध्ययन || 109
**गावित दिपक दामू, प्रा.डॉ.डी.आर.जगताप, नंदुरबार**

26) मध्ययुगातील भक्तीमार्गाचे पुरस्कर्ते : संत एकनाथ || 113
**प्रा. डॉ प्रल्हाद होंडे, घनसावगी**

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area International Research Journal | April 2018 Issue-49, Vol-01 | 079

17

# A Study of Human Development Index and Comparison of New and old index Components

Prof. Dr. K.K.Patil
H.O.D., Dept. of Economics,
Late. Sow. Kamaltai Jamkar Mahila Mahavidyalaya, Parbhani

Manorama Shridhar Pawar
Research Student,
Swami Ramanand Thirth Marathwada University, Nandad. ..

***********

## Introduction

Human Development implies all – round well being and Freedom of the people to make choices Income alone is not Human Development even Thought it helps to procure some of the basic requisites of material life. The United Nations Development Programme is historically an unique effort at international co-operation to improve comprehensively the economic, social and education well being of nearly three fourth of humanity living in developing countries, with five decades of experience in development co-operation with the international community. The HDI was conceived to cover achievement in three basic dimension longevity, education, and living standerd. 2010 Human Development Report was the new HDI calculated as the geometric mean of normalized indexes for each of the three dimensions of life, education and income.

In May,1990 the United Nations Development Programme UNDP launched the Human Development Report. It was pioneered by Mahbub-Ul-haq and Amartya Sen.

These human development report have stimulated discussions worldwide leading to what is now called the " Human Development Movement " which includes international and national governments, policy makers, planners, opinion leaders, media, Ngo's and various members of the civil society.

Human development has always been flexible. There can be as many human development dimensions as there are ways of enlarging people's choice.

Human Development reports propose composite indices that go beyond income based measures. The Human Development Index (HDI), Gender Development Index (GDI), Gender Empowerment Measure (GEM) and Human Poverty Index (HPI), have been Introduced in various HDRS since 1990.

## What is Human Development ?

United Nations Development Programme has defined human development as the process of enlarging people choices. The most ones are to lead long and healthy life, to be educated and to enjoy a dencant Standard of living. Additional choice include political Freedom, human rights and various ingredients of self respect.

## Human Development Measurements –

The Components are measured by four variables, GDP per capital (purchasing power of parity in us dollars). literacy rates combined with gross enrollment ratio and life expectancy at birth (years). The composite index of a country may be in a figure between 0 and 1 . one indicates high level of Human Development. while zero Stands for no level of human development. countries are given specific ranks based on their HDI's.

## Components of Human Development :-

According to Mahbub – Ul-Haq, there are four essential components in the human development paradigam.

## Sustainability –

The next generation deserves the

opportunity to enjoy the same well being that we now enjoy and this right makes sustainability essential.

**Equity -**

If development is the enlarge people choices, people must enjoy equitable access to opportunities.

**Productivity -**

An essential part of the human development paradigm is productivity which requires investments in people and enabling macroeconomic environment for them to achieve their maximum portential.

**Empowerment –**

Human development paradigm envisages full empowerment people are in a position to exercise choices of their maximum potential.

**Comparison of old and New Methodology in Human Development:**

**1. Lite expectany -**

As per old HDI minimum lite expectany 25 Years – 85 in new HDI minimum reduced 20 years 83.2

**2. Educational -**

As per new HDI mean years of scholling index (MYSI) is givin minimum value as zero and maximum value as 13.2 and (EYSI) is given of zero and maximum value as 20.6 for total education index minimum value is set as zero and maximum value is set as 0.951. The formula is changed for calculation.

**Income Index**

As per old HDI Minimum Income was $ 100- $ 40000.

As per new HDI $ 163.$ 108.211. In old gross domestic product was taken and new Hdi gross national Income was taken same formula.

**Comparison of new and old index components :**

**Old Methods :-**

This is the methodology used by the UNDP up until its 2010 report.

$$X - Index = \frac{X - \min(x)}{\max(x) \min(x)}$$

Where min (x) and max (x) are the lowest and highest Values the variable x can attain, respectively.

The Human Development Index (HDI) then represents the uniformly weighted sum with 1/3 contributed by each of the following factor indices.

1. Life Index (LEI)

$$\text{Life Expectancy Index} = \frac{LE - 25}{85 - 25}$$

2. Education Index (EI)

$$\text{Education Index} = \frac{2}{3} x\, ALI + \frac{1}{3} x\, GEI$$

$$\text{Adult Literacy Index (ALI)} = \frac{ALR - 01}{100 - 0}$$

$$\text{Gross Enrollment Index (GEI)} = \frac{GER - 0}{100 - 0}$$

3. Income Index–

Low value of income index is 100, High value $ 40000.

Income Index (GDPPC)

$$= \frac{\text{Log}(GDPPC) - \text{Log}(100)}{Log\,(40000) - Log\,(100)}$$

**New Methods.**

1. $$\text{Life expectancy Index (LEI)} = \frac{LE - 20}{83.2 - 20}$$

2. $$\text{Educational Index (EI)} = \frac{\sqrt{MYSI.X\, EYSI}}{0.951 - 0}$$

2.1. Mean years of schooling Index (EYSI)

$$MYSI = \frac{MYS - 0}{13.2 - 0}$$

2.2 Expected Years of schooling Index (EYSI)

$$EYSI = \frac{EYS - 0}{20.6 - 0}$$

3. $$\text{Income Index (II)} = \frac{\text{In}(GNIPC) - \text{In}(163)}{In\,(108.211) - In\,(163)}$$

Finally, The HDI is the geometric men of the previous three nomalized Indices

$$HDI = 3\sqrt{LEI\ x\ EI\ x\ II}$$

7. Method

The present study is purely based The on secondary data. The secondary data was related to the period of 2002 to 2016. Human Development Report and require information was compiled from various issues of Human Development reports published by UNDP.

The present study is purely based The on Secondary data The Secondary data is collected from census reports, statistical abstracts, publication, district hand book, Human Development reports and browsing through internet.

**Comparison of Human Development Index of India with other 14 countries and the world average for year 2017.**

Table 1.1

| Sr.No | HDI Value | Country Name | HDI Rank |
|---|---|---|---|
| 1 | 0.949 | Narway | 1 |
| 2 | 0.939 | Australia | 2 |
| 3 | 0.939 | Swaziland | 3 |
| 4 | 0.926 | Germany | 4 |
| 5 | 0.925 | Singapore | 6 |
| 6 | 0.924 | Neatherland | 7 |
| 7 | 0.923 | Ireland | 8 |
| 8 | 0.920 | Canada | 10 |
| 9 | 0.903 | Japan | 17 |
| 10 | 0.804 | Russia | 49 |
| 11 | 0.624 | India | 131 |
| 12 | 0.925 | Denmark | 5 |
| 13 | 0.921 | Iceland | 9 |
| 14 | 0.920 | America | 11 |

(Human Development Report 2017)

As per the report, HDI remained unchained For Indian in 2016 and positioned Indian at 131out of 188 Countries. " India's HDI value for 2016 is 0.624. Which falls in the medium human development category. Positioning the country at 131 out of 188. Between 1990 to 2016, India's HDI value increased from 0.428 to 0.624," said the UNDP report.

Among the BRICS Countries, Russia, Brazil and China are in the high HDI category with Russia securing the highest rank at 57, followed by Brazil at 79 and China at 91. As per report India rank is the middle category. Norway's HDI value for 2016 is 0.949 which falls in high human development category, positioning the country at 1 out of 188 countries.

**Human Development Index of different states in India.**

The table 1.2 depicted the HDI of the different states of India. The table is useful for us comparing the HDI values of the states.

Table 1.2

| State | HDI Value |
|---|---|
| Kerala | 0.790 |
| Delhi | 0.750 |
| Himachal Pradesh | 0.662 |
| Goa | 0.617 |
| Punjab | 0.605 |
| North – Eastern State | 0.579 |
| Maharashtra | 0.572 |
| Tamil Nadu | 0.570 |
| Haryana | 0.552 |
| Jammu and Kashmir | 0.529 |
| Gujarat | 0.527 |
| Karnatika | 0.519 |
| West Bengal | 0.492 |
| Uttarakhand | 0.490 |
| Andhra Pradesh | 0.473 |
| Assam | 0.414 |
| Rajasthan | 0.434 |
| Uttar Pradesh | 0.380 |
| Jharkhand | 0.376 |
| Madhya Pradesh | 0.375 |
| Bihar | 0.367 |
| Odisha | 0.362 |
| Chhattisgarh | 0.358 |
| India | 0.437 |

Source : (Human Development Report 2011)

Maharashtra is reported as having a higher HDI (0.527)than that of the country (0.437) Kerala, Punjab, Goa, Himachal Pradesh, Haryana finds a place in the medium HDI category based on the international classification of countries, where as Maharashtra finds place in low category. Maharashtra need to improve compare to the other state like Kerla, Goa.

**Human Development Index of the different districts of the Marathwada :**

The Marathwada region has eight

districts. The table 1.3 indicates the HDI of all districts of the Marathwada. The table compare the HDI of the Marathwada region with the Maharashtra.

Table 1.3

| District | HDI | Increase in HDI % | Relative Category | |
|---|---|---|---|---|
| | Year 2001 | Year 2012 | | |
| Aurangabad | 0.650 | 0.728 | 12 | High |
| Nanded | 0.558 | 0.657 | 18 | Low |
| Parbhani | 0.578 | 0.683 | 18 | Medium |
| Latur | 0.595 | 0.663 | 11 | Low |
| Beed | 0.606 | 0.678 | 12 | Medium |
| Hingoli | 0.561 | 0.648 | 16 | Low |
| Jalna | 0.554 | 0.663 | 20 | Low |
| Osmanabad | 0.588 | 0.649 | 10 | Low |
| Marathwada Averaage | 0.58625 | 0.6711 | 14 | |
| Maharashtra Average | 0.666 | 0.752 | 13 | |

(Source : Human Development Report 2012 of the Maharashtra)

If we compare the HDI of the different district of Marathwada for the year 2012. Human Development in Maharashtra has improved over time Between 2001 and 2012.

Maharashtra HDI value for 2012 is 0.752, Between 2002 to 2012. Maharashtra value increased from 0.666 to 0.752. As per report Aurangabad rank's high category. Positioning the Maharashtra at 12 out of 35 districts. District like Jalna Shown the great improvement compare to other districts. five districts comes under the low HDI, Two districts in medium category and only one districts under high category of the HDI.

**12. Conclusion –**

In this study we discuss that the HDI value and its parameters as well as different types of dimension to measures HDI in Indies states and districts wise HDI value.

1. HDI values focus on longevity, education and income.
2. Comparison of different the HDI indicators of Maharashtra with India for the year 2001, and 2011.
3. Indies HDI value for 2016 is 0.624. which falls in the medium human development category.
4. Between 1990 to 2016 India's HDI value increased from 0.428 to 0.624 said the UNDP report.
5. Keral's HDI value For 2011 is 0.790 which is highest in India.
6. In HDI Maharashtra Finds place in low category.
7. Human Development in Maharashtra has improved over time Between 2001 and 2011.
8. Human Development in Marathwada has improved over time, Between 2001 and 2012.
9. Aurangabad Comes in high HDI category.
10. Parbhani and Beed Comes in low HDI Category.

**Reference**

1. Human Development Report 2016.
2. Economic Survey of Maharashtra, Directorate of Statistics and Economics.
3. Anand, P and sen, A.K. (1994), Human Development Index : Methodology and Measurement HDR occasional papers.
4. Maharashtra Human Development Report 2002 and 2012.
5. Naik Vaishali, unpublished Ph.D Thesis, 2009.

□□□

ISSN - 2348-7143

Impact Factor – 6.261

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**August -2018**

**SPECIAL ISSUE- LXII(A)**

**Guest Editor**
Dr. Dinesh W. Nichit
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Shubhangi Dange

**Chief Editor**
Dr.Dhanraj T.Dhangar

**Executive Editor**
Prof.Virag S.Gawande

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC) Sr.No. 40705
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictonary of Research Journal Index (DRJI)

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*

Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705

ISSN : 2348-7143
August 2018

Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | वजन वाढणे तंत्रज्ञान युगातील एक गंभीर समस्या | प्रा. डॉ. विजया कन्नाके. | 6 |
| 2 | महाराष्ट्रातील भक्तिगंगा | प्रा. डॉ. कविता होले | 12 |
| 3 | स्त्री सक्षमिकरणात पुरुषांचे योगदान एक अध्ययन | प्रा. डॉ. किरण रा. बेलुरकर | 15 |
| 4 | किशोरींचा आहार आणि आरोग्य | प्रा. कु. सुषमा जयकुमार फरसोले | 19 |
| 5 | समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस.डब्लु. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य शिक्षणाविषयी जाणीवजागृतीचा तुलनात्मक अभ्यास | प्रा. डॉ. तक्षशिला मोटघरे | 22 |
| 6 | महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक | प्रोफेसर डॉ. के.के. पाटील /मनोरमा श्रीधर पवार | 26 |
| 7 | मेळघाटातील गवळी समाजाच्या लोकसाहित्यातून अविष्कृत होणारी सामाजिकता | प्रा.नरेंद्र जनार्दन पाखरे | 29 |
| 8 | इतर मागासवर्गीयांचे ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर | संजय शेंडे | 31 |
| 9 | जागतिक व्यापारी संघटना आणि भारतीय बँकिंग क्षेत्र | प्रा.डॉ.महादेव आसाराम रिठे | 35 |
| 10 | कुपोषणाची कारणे, लक्षणे जाणून त्यावरील उपाययोजना | कु. दयाश्री कोकाटे /डॉ. सुजाता सबाने | 39 |
| 11 | श्री.शंकरराव कोल्हे यांचे सहकार चळवळीतील योगदान | प्रा.झरेकर आर.एस. | 44 |
| 12 | भगवान बुध्द आणि धम्म | प्रा. किशोर नामदेवराव वाहाणे | 49 |
| 13 | स्त्री सक्षमीकरणात महात्मा गांधीजींची भूमिका | डॉ. ज्ञानेश्वर आर. यावले | 51 |
| 14 | भीषण वास्तवाचे विदारक दर्शन: बिराड | प्रा. डॉ. पंकज वानखडे | 53 |
| 15 | ''प्रभावी मागणी'' जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा मार्ग | प्रा. रविंद्र बा.शेंडे. | 58 |
| 16 | रजोनिवृत्तीची कारणे व परिणाम | विजया देविदासराव भोंड | 62 |
| 17 | लोकमान्य टिळकांची विचारधारा | सौ.छाया सवडतकर | 65 |
| 18 | किशोरवयीन मूलामूलींच्या समस्या | प्रा.सौ.सुषमा सु.जाजु | 68 |
| 19 | अमरावती जिल्हयातील बालगृहातील बालकांच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक दर्जाचे अध्ययन | प्रा. डॉ. सारिका एन. दांडगे (बोदडे) / प्राचार्य डॉ शारदा शरद गावंडे | 72 |
| 20 | मुलांच्या लठ्ठपणाची कारणे आणि उपाय | प्रा.विभा छ. घोडखांदे | 77 |
| 21 | आदिवासी क्षेत्रातील बालकांच्या आरोग्य विषयक कुपोसणाच्या समस्या आणि उपाय | डॉ. सौ. कीर्ती आ. वर्मा | 81 |
| 22 | मराठी नाटकाचा संक्षिप्त इतिहास | रीता वाळके (डंभाळे) | 84 |
| 23 | महाविद्यालयीन विद्यार्थीनीं मध्ये एच.आय.व्ही./एड्स संबंधी जागरूकता व प्रतिबंधात्मक ज्ञानाचे अध्ययन | प्रा. स्वाती वैद्य | 86 |

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
August 2018

# महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक

**प्रोफेसर डॉ. के.के. पाटील**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय,
परभणी - 431401

**मनोरमा श्रीधर पवार**
संशोधक विद्यार्थीनी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

**प्रस्तावना :**

पूर्वी देशाची आर्थिक उपलब्धी मोजण्यासाठी दरडोई स्थुल राष्ट्रीय उत्पादनाचा निकष विचारात घेतला जात असे. परंतु त्यात आर्थिक विकासाचा निर्देशांक म्हणून बऱ्याच उणिवा आढळून आल्या. म्हणूनच अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक व्यापक असे मापनाचे साधन शोधून काढण्याचा प्रयत्न केला व त्यातूनच मानव विकासाची संकल्पना संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाद्वारे (UNDP) मांडण्यात आली.

मानवी विकास हा आर्थिक विकासावर आणि उत्पन्नाच्या विनियोगावर अवलंबून असतो. तसेच मानवी विकास हा काही बिगर आर्थिक घटकांवरही अवलंबून असतो मानवी विकासामुळे सर्वांगिण विकास होतो. त्यामुळे व्यक्तीची उत्पादकता वाढून राष्ट्राच्या उत्पादकतेचा विकास होण्यास मदत होते. आर्थिक विकासासाठी मानवी संसाधनांना फार महत्वाचे स्थान आहे. मानवी संसाधनांचा संबंध राष्ट्राच्या नागरिकांशी असतो. मानवी संसाधनांची व्याप्ती व स्वरूप ही राष्ट्रातील लोकसंख्या शिक्षण व रोजगार या घटकांशी निगडित असते भांडवलशाही अर्थव्यवस्थांना सुध्दा चांगल्या मानवी साधन सामुग्रीची गरज असते.

**मानव विकास निर्देशांक :**

व्यक्तिचा सर्वांगिन विकास घडवून आणण्यासाठी त्यांना विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी मानव विकास संकल्पना महत्वाची आहे. शिक्षण, आरोग्य व उत्पन्न या जीवनाच्या तीन महत्वाच्या पैलुसाठी दिलेला लढा व त्याची प्रत्यक्षात झालेली पूर्तता यांचा मिलाप म्हणजेच मानव विकास होय मानव विकास घडवून येण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य शिक्षण व शुध्द पिण्याचे पाणी या महत्वपूर्ण सुविधा मानवास प्राप्त करण्यासाठी दिलेला लढा म्हणजे मानव विकास हा सर्वांगीन विकास करण्याची गुरूकिल्ली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने १९९० मध्ये पहिला मानव विकास अहवाल प्रकाशित केला.मानवी विकास निर्देशांकाची संकल्पना मांडण्याचे श्रेय १९९८ चे नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन आणि पाकिस्तानचे अर्थतज्ञ महबूब-उल-हक यांच्याकडे जाते. यामध्ये साक्षरता, आयुर्मान व दरडोई उत्पन्न या तीन निर्देशांकाबाबत कमाल व किमान प्रमाण ठरविण्यात आले. या निकषांच्या आधारे मानव विकास निर्देशांक काढण्यात येतो. निर्देशांकाचे मुल्य ० ते १ च्या दरम्यान असते UNDP ने मानव विकास निर्देशांक मुल्याचे तीन गट पाडले आहेत व त्यानुसार देशाचे वर्गीकरण केले आहे.

| मानव विकास निर्देशांक गट | किमान व कमाल मर्यादा |
|---|---|
| १ उच्च मानव विकास गट | ०.८०० ते १.०० |
| २ मध्यम मानव विकास गट | ०. ५० ते ०. ७९९ |
| ३ निम्न मानव विकास गट | ०. ८०० ते १.०० |

०.० ते ०.४९९ निर्देशांक मुल्य असणारे देश निम्न मानव विकास गटात, ०.५० ते ०.७९९ मुल्य असणारे मध्यम मानव विकास गटात, तर ०.८० ते १.०० निर्देशांक मुल्य असणारे उच्च मानव विकास गटात आहेत.

**मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी पुढील घटक विचारात घेतले जातात.**

१) **आरोग्य :**देशाचा आरोग्याचा स्तर मोजण्यासाठी जन्माच्या वेळेचे आयुर्मान ही निर्देशक वापरला जातो.

२) **शिक्षण :** देशाचा शैक्षणिक स्तर मोजण्यासाठी पुढील दोन निर्देशांक वापरले जातात.

i) २५ वर्षापेक्षा अधिक वयांच्या प्रोढांची सरासरी शालेय वर्ष (mean year of schooling)

ii) १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांची अपेक्षित शालेय वर्ष (expected year of schooling)

शिक्षणाचा निर्देशांक या दोन्ही निर्देशांकाचा भूमितीय मध्य असतो.

३) **जीवनमानाचा दर्जा** - देशाच्या जीवनमानाचा दर्जा मोजण्यासाठी दरडोई स्थुल राष्ट्रीय उत्पन्न

(per capita GNI) हा निर्देशांक वापरला जातो.

प्रथम वरील चार निर्देशांकासाठी किमान व कमाल मुल्ये ठरविले जातात. त्यानुसार प्रत्येक देश या मुल्याच्या दरम्यान कोठे आहे. यानुसार त्या देशाचा मानव विकास निर्देशांक ठरवला जातो त्याचे मुल्य ० ते १ च्या दरम्यान व्यक्त केले जाते.

**मानव विकास निर्देशांक व महाराष्ट्र**

महाराष्ट्राचे प्रशासकीय दृष्टिने सहा महसुली प्रभाग आहेत कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर अशा सहा महसुली विभागात ३५ जिल्ह्यांची विभागणी करण्यात आली आहे.

भारतात राज्य पातळीवरचा मानव विकास अहवाल सर्व प्रथम मध्य प्रदेश या राज्याने १९९५ मध्ये प्रसिध्द केला.

१९९९ मध्ये प्रसिध्द केलेल्या भारताच्या मानव विकास अहवालात महाराष्ट्राचे मानव विकास मुल्य ०.५५ होते. यानंतर महाराष्ट्र शासनाने २००२ मध्ये आपला पहिला मानव विकास अहवाल प्रसिध्द केला हा अहवाल तयार करण्यासाठी केंद्रीय नियोजन आयोग यु.एन.डी.पी. व महाराष्ट्र शासनाच्या तज्ञांचे मार्गदर्शन लाभले. या अहवालात महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक काढण्यात आले.

**महाराष्ट्रातील जिल्हानिहाय मानव विकासाची स्थिती**

**(२००२ च्या अहवालानुसार)**

| अं.क्र | मानव विकास निर्देशांक | मानव विकास निर्देशांक | क्रमवारी ३५ जिल्ह्यापैकी | स्तर (उच्च / माध्यम / न्युन) |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | १.०० | २ | उच्च |
| २ | बृहनमुंबई | १.०० | १ | उच्च |
| ३ | ठाणे | ०.८२ | ३ | उच्च |
| ४ | रायगड | ०.७० | ६ | उच्च |
| ५ | रत्नागिरी | ०.४४ | २२ | न्युन |
| ६ | सिंधुदुर्ग | ०.६० | ०९ | उच्च |
| ७ | नाशिक | ०.५१ | १३ | मध्यम |
| ८ | धुळे | ०.३६ | ३० | न्युन |
| ९ | नंदुरबार | ०.२८ | ३२ | न्युन |
| १० | जळगाव | ०.५० | १४ | मध्यम |
| ११ | अहमदनगर | ०.५७ | ११ | मध्यम |
| १२ | पुणे | ०.७६ | ०४ | उच्च |
| १३ | सातारा | ०.५९ | १० | उच्च |
| १४ | सांगली | ०.६८ | ०७ | उच्च |
| १५ | सोलापुर | ०.४८ | १७ | न्युन |
| १६ | कोल्हापूर | ०.६४ | ०८ | उच्च |
| १७ | औरंगाबाद | ०.५७ | १२ | मध्यम |
| १८ | जालना | ०.२७ | ३३ | न्युन |
| १९ | परभणी | ०.४३ | २१ | न्युन |
| २० | हिंगोली | ०.४३ | २५ | न्युन |
| २१ | बीड | ०.४७ | १८ | न्युन |
| २२ | नांदेड | ०.३७ | २९ | न्युन |
| २३ | उस्मानाबाद | ०.३८ | २८ | न्युन |
| २४ | लातूर | ०.४७ | १९ | न्युन |
| २५ | बुलढाणा | ०.४१ | २७ | न्युन |
| २६ | अकोला | ०.४४ | २३ | न्युन |
| २७ | वाशीम | ०.३६ | ३१ | न्युन |
| २८ | अमरावती | ०.५० | १५ | मध्यम |
| २९ | यवतमाळ | ०.२२ | ३४ | न्युन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | वर्धा | ०.४९ | १६ | मध्यम |
| ३१ | नागपूर | ०.७१ | ५ | मध्यम |
| ३२ | भंडारा | ०.४६ | २० | न्युन |
| ३३ | गोंदिया | ०.४६ | २१ | न्युन |
| ३४ | चंद्रपूर | ०.४१ | २६ | न्युन |
| ३५ | गडचिरोली | ०.२१ | ३५ | न्युन |
| | महाराष्ट्र | ०.५८ | - | मध्यम |

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की उच्च मानवी विकासाची पातळी असणाऱ्या जिल्ह्यामध्ये फक्त १० जिल्ह्यांचा समावेश होतो. तर महाराष्ट्रातील ०६ जिल्ह्यांचा मानवी विकास मध्यम असल्याचे दिसून येते आणि १९ जिल्हे हे निम्न मानवी विकासाच्या स्तरामध्ये येतात. महाराष्ट्रात सर्वात खालच्या पातळीवर गडचिरोली जिल्ह्याचा क्रमांक लागतो. तर सर्वात उच्च पातळीवर मुंबई उपनगर या जिल्ह्याचा समावेश होता.

**निष्कर्ष :**

१) विभाग निहाय मानव विकासाबाबत कोकण विभाग वरचढ आहे.
२) त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर पुणे तिसऱ्या क्रमांकावर नागपूर विभाग आहे. चौथ्या क्रमांकावर नाशिक पाचव्या क्रमांकावर औरंगाबाद तर सहाव्या क्रमांकावर अमरावती विभाग आहेत.
३) मानव विकास निर्देशांकाबाबत जिल्हानिहाय तफावत खूप मोठ्या प्रमाणात आढळते.
४) कोकण विभागातील रत्नागिरी जिल्हा वगळता इतर सर्व जिल्हे उच्च मानव विकास गटात आहेत.
५) पूर्ण विभागातील सोलापूर निम्न मानव विकास गटात तर इतर सर्व जिल्हे उच्च गटात आहेत.
६) नागपूर विभागात नागपूर उच्च गटात तर वर्धा मध्यम मानव विकास गटात तर उर्वरित सर्व जिल्हे मध्यम मानव गटात आहेत.
७) ,गडचिरोली जिल्हा तर महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यात खालच्या स्थानावर आहे.
८) औरंगाबाद विभागात औरंगाबाद जिल्हा मध्यम गटात तर उर्वरित सर्व जिल्हे निम्न मानव विकास गटात आहेत.

**शिफारशी :**

महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक ०.५८ असून महाराष्ट्र मध्यम मानव विकास गटात मोडतो. महाराष्ट्राचा मानव विकास साधावयाचा झाल्यास शिक्षण आरोग्य सेवा, पायाभुत सुविधामध्ये वाढ, भांडवली, गुंतवणूक, सेवा क्षेत्राचा विकास होणे अपेक्षीत आहे. सरकारने आदिवासी व ग्रामीण भागामध्ये विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच कमी विकास असलेल्या जिल्ह्यांकडे विशेष लक्ष दिल्यास भविष्यात भारत हा देश जगामध्ये प्रमुख देश बनेल.

मानव विकास प्रक्रियेत सरकारच्या प्रयत्नासोबत जनसहभागही अत्यंत आवश्यक आहे. लोकांमध्ये जाणिव निर्माण करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, या सवलतीचा मोठ्या प्रमाणात प्रसार होणे आवश्यक आहे. ज्यामुळे रोजगाराच्या चांगल्या संधीचा विस्तार घडून विकासाची फळे सर्वांना प्राप्त होतील.

**समारोप :**

वरील विवेचनावरून लक्षात येते की, महाराष्ट्र मानव विकासाबाबत मध्यम गटात समाविष्ट होतो. असे असले तरी महाराष्ट्रात मानव विकासाच्या घटकांबाबत उपलब्धता कमी आहे. मानव विकासासाठी जेवढी गुंतवणूक होणे गरजेची आहे. तेवढी महाराष्ट्रात होत नाही. त्यामुळे मानव विकास निर्देशांक मुल्य वाढविण्यात अडचणी निर्माण होतात..

**संदर्भ :**

१) महाराष्ट्र शासन : मानव विकास अहवाल (२००२)
२) भारतीय अर्थव्यवस्था : अरिहंत प्रकाशन
३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी : (२०१२-१३)
४) आर्थिक मानव संसाधन विकास : डॉ. मनोज कुमार, अर्जुन पब्लिशिंग हाऊस २०१३.
५) मराठवाड्यातील जिल्ह्याची आर्थिक, सामाजिक समालोचन, अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.